## RTE Act - २००९ अंतर्गत
## शाळा मान्यता (नमुना - दोन)

ग्राम :- चंद्रपूर
दुरध्वनी :- ०७१७२-२५२५६०
ई मेल :-eopzpchandrapur@gmail.com
फॅक्स :- ०७१७२-२५२५६०
जावक क्र.:- जि.प.चं.प्रा./RTE/शा.मा./423/२०१९
दिनांक :- 23/ 6/२०१९
जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेकार्यालय,
जिल्हा - चंद्रपूर, राज्य - महाराष्ट्र

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव**
**ज्ञानसेवा मंडळ,मुल रोड चंद्रपूर**

**विषय - बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचाहक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचाहक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ -** १) मा. शिक्षणाधिकारी जि.प.चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक -प्राथ/अनुदान/१९२/१९७२ दिनांक २५/०१/१९७२
२) शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई- NOC/२००९/(५०/०९) SE-१ दिनांक २४/०१/२०११
३) NO CBSE/AFF/११३०२८४(EX-००८९४-१४१५१/७०९६३१ दिनांक ०७/०५/२०१४
४) गटशिक्षणाधिकारी, प.स.चंद्रपूर यांचा शाळा तपासणी अहवाल दिनांक ०५/०२/२०१९
५) मुख्याध्यापक, माउंट कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कुल CBSE,चंद्रपूर यांचे पत्र दिनांक ०३/०१/२०१९

**महोदय/महोदया,**

संदर्भ पत्र क्र. १ नुसार **ज्ञानसेवा मंडळ,मुल रोड चंद्रपूर** व्दारा संचालित **माउंट कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कुल CBSE,चंद्रपूर** या **इंग्रजी** माध्यमाच्या खाजगी कायम विनाअनुदानित शाळेला, **जुन १९७१** पासुन प्राथ शाळा म्हणुन विनाअनुदानित तत्वावर सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे. संदर्भ क्र. २ व ३ नुसार, वर्ग १ ते १० वा वर्ग सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. ५ नुसार शाळेचे मुख्याध्यापकांनी शाळेला मान्यता देणेबाबत प्रस्ताव सादरकेलेला आहे.

संदर्भ क्र.४ नुसार, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,चंद्रपूर यांनीसदर शाळेची तपासणी केली आहे.त्या अहवालानुसार सदर शाळेत सद्या इयत्ता **१ ते १०** चे वर्ग प्रत्यक्षसुरू आहेत.तसेचसदर शाळा RTE Act-२००९ मधील भौतिक सुविधांच्या मानकांची पूर्तताकरण्याचे अटीवर शाळेला मान्यता प्रदानकरण्याकरीता शिफारसकेलेली आहे.त्याआधारे**दिनांक ०१/०२/२०१९ पासून दिनांक ३१/०१/२०२२** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ते ८** करीता **माउंट कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कुल CBSE,चंद्रपूर** या शाळेसखालील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

**वरील मान्यता हीखालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवि नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यासकोणत्याही परिस्थितीतकोणतेही बंधन नसेल.
२. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचाहक्क अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्रबालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचाहक्क अधिनियम, २०११ (जोडपत्र दोन) मधीलतरतूदीचे, शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षणहोईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असेकी, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालनकरण्यात येईल.
४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/शाळाकोणतीहीकॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात, किंवा वंश, जन्मठिकाणकिंवा यापैकीकोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्णहोईपर्यंतकाढून टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्णहोईपर्यंतकोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारितकेलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्तीकरण्यात येईल. आणखी असेकी, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण

न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्टकेलेलीत्याची / तिची कर्तव्ये **शिक्षक** पार पाडतील.

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेनेखाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याचीसुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारेतयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.

**तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणेहोत्या-**

- शाळेच्या परिसराचेक्षेत्रफळ- **९००० चौ.मी.**
- एकूण बांधकाम क्षेत्रफळ- **४५०० चौ.मी.**
- खेळाच्या मैदानाचेक्षेत्रफळ-**४५०० चौ.मी.**
- वर्गखोल्यांची संख्या - **३०**
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाचीखोली - **आहे.**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल - **आहे** पिण्याच्या पाण्याची सुविधा - **आहे. (कमोड आहे)**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर - **नाही (लागू नाही)**
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडा विषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता - **आहे.**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध - **आहे.**
- सर्व सुविधा विना अडथळा (रॅम्प) उपलब्ध आहेत काय? - **आहे.**
- शाळेला संरक्षण भिंत आहे काय? - **आहे.**
- शाळेत अग्निशमन यंत्र आहे काय? - **आहे.**

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगणहे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनि विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वे नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळाकोणत्याही व्यक्तीच्य, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतरकोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखेसनदी लेखापालाकडून लेखा परिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक **२७१३०१०१८०९** असा आहे, हासांकेतांक या कार्यालयाशीकोणताही पत्रव्यवहार करतांनाकृपयातो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षणसंचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणीकरतील असे अहवाल व माहिती शाळेनेसादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तताकरण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूरकरण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचेकोणतेही नूतनीकरण असल्यास, नूतनीकरणकेल्याचीसुनिश्चित करावी.

**१९.** बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचाहक्क अधिनियम - २००९ प्रमाणे शाळेला आवश्यक असणा-या बाबी पूर्ण असने आवश्यक आहे. तसेच संदर्भिय तपासणी अहवालाच्या आधारे व अपूर्ण असलेल्या भौतिक सुविधांच्या **मानकांची पूर्तता तिन महिन्याचे आत पूर्णकरण्याचे अटीवर** शाळेला मान्यता प्रदानकरण्यात येत आहे. परंतू प्रत्यक्ष फेरतपासणीच्या वेळी त्यात कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळून आल्यास **आपल्या शाळेची मान्यता त्वापूढे आपोआपसंपूष्टात येईल.**

**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**

**प्रतिलिपी :-**

१. मुख्याध्यापक, **माउंट कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कुल CBSE,चंद्रपूर** यांना माहितीस अग्रेषीत.

२. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, चंद्रपूर यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत.

**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**